महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ 07 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 250 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

थोडक्यात महत्वाचे

## भिवंडी : बेकायदा इमारतीविरोधात सहा.आयुक्तांची तक्रार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : महापालिका क्षेत्रातील एका आठमजली बेकायदा इमारतीविरोधात प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तांनी तक्रार दिली आहे. याप्रकरणी शांतिनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. निजामपुरा येथील भूखंड क्रमांक पाचवर मालमत्ता क्रमांक ५१०/०, बाळा कम्पाउंड या ठिकाणी तळ अधिक आठ मजल्यांचे बांधकाम केले आहे. या प्रकरणी शांतीनगर पोलिस ठाण्यात महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नवी मुंबईत तेराशे आफ्रिकन नागरिक हद्दपार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाशी, ता. ६** : नवी मुंबई पोलिसांकडून सध्या ड्रग्जविरोधात मोहीम हाती घेण्यात आली आहे. शहरात विविध ठिकाणी केलेल्या कारवाईअंतर्गत नवी मुंबई पोलिसांनी सुमारे १०० आफ्रिकन नागरिकांना अमली पदार्थासह अटक केली आहे, तर अमली पदार्थाची तस्करी करणारे आणि बेकायदा वास्तव्य करणाऱ्या सुमारे १३०० लोकांना देशातून हद्दपार केल्याची माहिती नवी मुंबई पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी दिली. काही महिन्यांपासून अमली पदार्थ तस्करीविरोधात पोलिसांनी मोहीम राबवली आहे. यात चरस आणि हेरॉइनसारख्या अमली पदार्थाची अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधून तस्करी होते, तर कोकेनचा पुरवठा प्रामुख्याने दक्षिण आफ्रिकेतील नागरिकांमार्फत केला जातो. सिंथेटिक औषधे मात्र भारतात मोठ्या प्रमाणात तयार होत असल्याचा खुलासा आयुक्त भारंबे यांनी मुख्यालयात पत्रकारांशी बोलताना केला.

## ठाण्यातील लॉजना टाळे ठोका

### गणेश नाईकांकडे महिलांची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : पूर्व ठाण्यात भरवस्तीत देहविक्रीचा व्यापार करणाऱ्या लॉजला टाळे ठोकण्याची कारवाई करण्याची मागणी महिलांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबारात केली असून पोलिस कोणती भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ठाणे पूर्व भागात स्टेशन परिसरात गुरुकृपा आणि धनराज हे दोन लॉज आहेत. या लॉजमध्ये बेकायदेशीरपणे देहव्यापार सुरु असून अल्पवयीन मुली आणि वारांगना रस्त्यावर उभ्या राहून लज्जास्पद हावभाव करतात, त्यामुळे महिला आणि पुरुषांना देखिल त्या भागातून चालणे कठीण झाले आहे. या दोन लॉजमध्ये ग्राहक यावेत यासाठी त्या महिला रस्त्यावर उभ्या राहून सावज शोधत असतात, त्यामुळे या भागातून कामावर जाणाऱ्या महिला आणि मुलींकडे देखिल वेगळया नजरेने पाहिले जात आहे. कोपरी पोलिस कोणत्याही प्रकारची कारवाई करत नसल्याने दिवसेंदिवस या भागात वारांगनांची संख्या वाढत चालली आहे. त्यामुळे या दोन लॉजच्या विरोधात कारवाई करून पूर्व ठाण्यातील महिलांना दिलासा द्यावा, अशी मागणी सुवर्णा अवसरे, मंगला शर्मा आणि भारती सावंत या महिलांनी वनमंत्री गणेश नाईक आणि माजी नगरसेवक भरत चव्हाण यांच्याकडे केली आहे.

वनमंत्री श्री.नाईक हे आमच्या मागणीकडे लक्ष देऊन पूर्व भागातील लॉजमध्ये सुरु असलेला वेश्याव्यवसाय बंद करण्यासाठी पोलिसांना आदेश देतील, अशी अपेक्षा तक्रारदार महिलांनी केली आहे.

# विधान परिषदेसाठी इच्छुकांची लॉबिंग



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

विधानसभा निवडणुकानंतर रिक्त झालेल्या विधान परिषदेच्या 5 जागांसाठी निवडणूक जाहीर झाली असून सध्या शिवसेनेत आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये या जागांसाठी जोरदार लॉबिंग सुरू आहे .येत्या 27 मार्चला या पाच जागांसाठी निवडणूक होणार आहे .यात भाजपच्या 3 आणि शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाच्या खात्यात प्रत्येकी 1 / 1 जागांवर कोणाची वर्णी लागणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे . विधान परिषदेच्या पाच रिक्त जागांसाठी 27 मार्च रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार असून त्यासाठीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केलाय .यात महायुती मधील भाजपचे तीन राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गटाच्या प्रत्येकी एक जागा रिक्त आहेत. या जागांसाठी ही निवडणूक होणार असून शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून या जागांसाठी जोरदार लॉबिंग सुरू आहे .

### निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता

विधान परिषदेच्या ५ रिक्त जागांमुळे आता शिंदे गट आणि अजित पवार गटाच्या नेत्यांनाआमदार होण्याची संधी मिळणार असून यात तीन भाजप आणि एकेक आमदार शिंदे आणि अजित पवार गटाचा असेल .दरम्यान निवडून येण्यासाठी 57 मतांचा कोटा लागणार असून विरोधी पक्षांच्या तीनही पक्षांची एकत्रित बेरीज केली तरी 57 मते होण्याची शक्यता नसल्याने ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता आहे .ज्या पक्षाचा जो आमदार विधान परिषदेतून विधानसभेत गेला ती जागा त्या पक्षाला दिली जाण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात येत आहे.

### निवडणूक कार्यक्रम कसा असणार ?

१. 17 मार्च ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख आहे
२. 18 मार्चला उमेदवारी अर्जांची छाननी होणार
३. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख 20 मार्च आहे .
४. 27 मार्चला सकाळी नऊ ते संध्याकाळी चार या वेळेत मतदान प्रक्रिया होणार आहे.
५. मतदान पूर्ण झाल्यानंतर संध्याकाळी पाच वाजता मतमोजणीला सुरुवात होऊन निकाल जाहीर होईल.

### 5 पैकी 3 जागा भाजपच्या कोट्यात


भाजपकडून सहा नावे चर्चेत

राम सातपुते
जगदीश मुळीक
संदीप जोशी
संजय केणीकर
प्रमोद जठार
केशव उपाध्ये

### कुणाची वर्णी लागणार ?

विधानसभा निवडणुकीनंतर आमशा पाडवी, प्रवीण दटके राजेश विटेकर, रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर हे विधान परिषदेतील आमदार विधानसभेवर निवडून आल्याने विधान परिषदेच्या पाच जागा रिक्त झाल्या आहेत .आता या जागांवर शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून जोरदार प्रयत्न होताना दिसतात .शिवसेनेत रवींद्र फाटक शितल म्हात्रे आणि चंद्रकांत रघुवंशी यांचे नाव चर्चेत आहे .तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे झिशान सिद्दकी,संग्राम कोते पाटील आणि आनंद परांजपे यांची नावे चर्चेत आहेत.

## उल्हासनगर सेंट्रल रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. बनसोडे निलंबित



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** - अत्यवस्थ रुग्णाला १०८ नंबरची ॲम्ब्युलन्स उपलब्ध करून न दिल्याने रुग्णांचा २३ जानेवारीला मृत्यू झाल्याचा प्रकार घडला होता. याप्रकारणी विधानसभेत तारांकित प्रश्न उचलण्यात आल्यावर आरोग्य विभागाने रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ मनोहर बनसोडे यांच्यासह दोघा डॉक्टरांना निलंबित करण्यात आले. उल्हासनगर कॅम्प नं-१ येथील राहुल इंदाले या ३५ वर्षीय इसमाची तब्येत बिघडल्याने, गेल्या महिन्यात मध्यवर्ती रुग्णालयात भरती केले होते. २३ जानेवारीला गुरुवारी दुपारी ३ वाजता राहुल यांची तब्येत बिघडल्यावर, पुढील उपचारासाठी कळवा रुग्णालयात हलविण्याचा निर्णय नातेवाईकांनी घेतला. त्यासाठी १०८ नंबरच्या ॲम्ब्युलन्सला फोन केला. मात्र दोन तास ॲम्ब्युलन्स सेवा उपलब्ध होणार नाही, असे रुग्णांच्या नातेवाईकांना रुग्णालयातील डॉक्टरांनी सांगितले. यावेळी दुसरी ॲम्ब्युलन्स रुग्णाला उपलब्ध करून दिली नाही. तर दुसरीकडे रुग्णाची तब्येत बिघडत होती. नातेवाईकानी रुग्णालयाची अथवा खाजगी ॲम्ब्युलन्स बोलाविण्याची विनंती डॉक्टर व नर्सला केल्यानंतरही रुग्णवाहीका उपलब्ध करून दिली नाही. मध्यवर्ती रुग्णालयात चाललेला गोंधळ व १०८ नंबरची ॲम्ब्युलन्स सायंकाळीचे साडे सात वाजे पर्यंत आली नाही. दरम्यान राहुल इंदाले यांची तब्येत बिघडवून त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी समाजसेवक शिवाजी रगडे यांनी रुग्णालयातील आरोग्य सुविधा, १०८ नंबरची रुग्णवाहिका यांचे धिंडवडे काढले होते. दरम्यान याप्रकरणी विधानसभेत तारांकित प्रश्न उचलल्यानंतर आरोग्य विभागाने रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ बनसोडे यांच्यासह दोघे डॉक्टरावर निलंबनाची कारवाई केली.

## कचराकोंडी करणाऱ्या कंत्राटदाराला ब्लॅकलिस्ट करा

### आमदार बालाजी किणीकर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ** : कचरा वाहतूक करणाऱ्या कंत्राटदाराच्या कामगारांनी केलेल्या संपामुळे गेल्या काही दिवसात अंबरनाथ शहरातील कचऱ्याचा प्रश्न गंभीर झाला होता. या प्रश्नावर तोडगा न निघाल्याने ऐन महाशिवरात्रीत शहरभर कचऱ्याचे ढीग लागले होते. हा प्रश्न पालिकेने स्वतंत्र यंत्रणा उभारून सोडवण्याचा प्रयत्न केला. आता आठवडाभरानंतर स्थानिक आमदार बालाजी किणीकर यांनी संबंधित कंत्राटदाराचे काम बंद करून त्याला काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत किणीकर यांनी ही मागणी केली.

अंबरनाथ शहरातील कचराप्रश्न विविध टप्प्यांवर गेल्या काही वर्षात रखडल्याचे दिसून आले आहे. काही वर्षांपूर्वी अंबरनाथच्या वेशीवर मोरिवलीजवळ बेकायदा पद्धतीने कचराभूमी तयार करण्याचा प्रताप पालिका प्रशासनाने केला होता. त्यानंतर नागरी वस्तीजवळ पर्यायी जागेत कचरा हलवून स्थानिक नागरिकांच्या रोषाला पालिका प्रशासनाला सामोरे जावे लागले होते. सध्या अंबरनाथसह बदलापूर आणि उल्हासनगर शहरांचा संयुक्त घनकचरा प्रक्रिया प्रकल्प राबवण्यासाठी तयारी सुरू आहे. मात्र हे सुरू असतानाच गेल्या काही दिवसांपासून अंबरनाथ शहरात कचराकोंडी झाल्याचे चित्र होते.

## हसन मुश्रीफांनी पालकमंत्रीपद सोडले



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते आणि मंत्री हसन मुश्रीफ यांच्याबद्दल एक मोठी बातमी समोर आली आहे. हसन मुश्रीफ यांनी वाशिमच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी सोडली आहे. वाशिमचे पालकमंत्री म्हणून मुश्रीफ यांची नेमणूक करण्यात आली होती, मात्र आता त्यांनी वाशिमचे पालकमंत्री पद सोडल्याची बातमी समोर आली आहे. नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्री पदाचा तिढा अद्याप सुटलेला नाही, त्यावरून महायुतीतील पक्षांमध्ये अद्यापही धुसफूस सुरू आहे. मात्र असे असतानाच हसन मुश्रीफांनी हा निर्णय घेतल्याने चर्चांना उधाण आलं आहे. सहावेळा आमदार राहिलेले हसन मुश्रीफ यांच्याकडे फक्त तीन आमदार असलेल्या वाशिम जिल्ह्याचं पालकमंत्रीपद सोपवण्यात आलं होतं.

कोल्हापूरचे आमदार आणि मंत्री असलेले मुश्रीफ यांना ज्या जिल्ह्याच पालकमंत्री पद देण्यात आलं तो वाशिम जिल्हा बराच दूरचा आहे. कोल्हापूर ते वाशिम हा प्रवास जवळपास 600 किलोमीटरचा आहे. त्यामुळे वाशिमचं पालकमंत्री पद मिळाल्यानंतर त्या ठिकाणी येण्याजाण्यासाठी मुश्रीफ यांचे प्रवासात जवळपास दोन दिवस जात होते.

त्यामुळे कोल्हापूर या त्यांच्या मतदारसंघात त्यांना लक्ष देता येत नव्हतं. या कारणास्तव त्यांनी वाशिमचं पालकमंत्री पद सोडल्याची माहिती समोर येत आहे.

## झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रभावीपणे राबवा

### रवींद्र चव्हाण यांची सूचना



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्र हद्दीत खासगी आणि सरकारी जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रभावीपणे राबविण्यात यावी. प्रत्येक लाभार्थी घटकाला या योजनेचा लाभ मिळाला पाहिजे यादृष्टीने प्रयत्न करण्याच्या सूचना भाजपचे प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी बुधवारी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या मुंबईतील अधिकाऱ्यांना दिले. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण क्षेत्रात किती अंमलबजावणी झाली आणि करायची असेल तर ती कशा पध्दतीने करता येईल. लाभार्थींना या योजनेचा अधिकाधिक लाभ कसा मिळेल, या दृष्टीने भाजप प्रदेश कार्याध्यक्ष आणि आमदार रवींद्र चव्हाण यांनी बुधवारी मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या कार्यालयात जाऊन प्राधिकरणाचे उपजिल्हाधिकारी अश्विनी जोशी, तहसीलदार विजय वाकोडे, साहाय्यक अधिकारी हर्षद घोटेकर यांची भेट घेतली.

मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण क्षेत्रात ज्या स्थानिक स्वराज्य संस्था भागात ही योजना तातडीने राबविण्यासाठी अनुकूल परिस्थिती आहे. तेथे या योजनेचा विनाविलंब शुभारंभ करावा. या योजनेतून खरा लाभार्थी अजिबात वंचित राहता कामा नये. प्राधिकरणाच्या अन्य क्षेत्रातही खासगी, शासकीय जमिनींवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना अधिक प्रभावीपणे, गतिमानतेने राबविता येईल यासाठी प्राधिकरणाने वेगाने हालचाली सुरू कराव्यात. या योजनेच्या अंमलबजावणीत भूक्षेत्र अन्य काही अडथळे येत असतील तर त्याचे शासन पातळीवर निराकरण करण्यासाठी आपण पुढाकार घेऊ, असे आश्वासन आमदार रवींद्र चव्हाण यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना दिले. प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनीही ही योजना मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण क्षेत्रात राबविण्यासाठी आम्ही सज्ज असल्याचे सांगितले.

### सत्याऐंशी लाखांची जलजीवन योजना; तरीही

## आदिवासींच्या डोक्यावरील हंडा कायम



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : गावा गावातील महिला, मुले मुली यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागू नये, त्यांच्या डोक्यावरील हंडा उतरावा, त्यांना त्रास होऊ नये म्हणून देशाच्या पंतप्रधानांनी जलजीवन मिशन योजनेची घोषणा १५ऑगष्ट२०१९रोजी केली, हरघर नल, नलसे जल असेही ठासून सांगण्यात आले, परंतु मुरबाड तालुक्यातील ग्रामपंचायत भोरांडे अंतर्गत असलेल्या पेजवाडी फांगणे गावात तब्बल८७लक्ष रुपयांची जलजीवन मिशन योजना येवून देखील या आदीवासी, गोरगरीब लोकांना शेकडो मैल वनवन भटकून पाणी आणावे लागत आहे, तर फांगणे गावात देखील परिस्थिती वेगळी नाही, येथे तर ३लक्ष रुपये खर्च करून उभारलेल्या टाकीचे४ही नळ कोरडे ठक्क पडले आहे. त्यामुळे लाखो करोडो रुपयांच्या या योजना नक्की कोणासाठी? असा प्रश्न निर्माण होत आहे.मुरबाड तालुक्यात सध्या योजना थांबवा, पैसा लांबवा असा एक कलमी कार्यक्रम सुरू असल्याचे दिसून येत आहे, माळशेज घाटातील भोरांडे ग्रामपंचायत मध्ये फांगणे, पेजवाडी, भोईरवाडी, रोंगटेवाडी, उदाळडोह, दिवाणपाडा, आणि आवळेगाव अशा गावाचा समावेश आहे.

गावापासून पाचशे ते हजार मिटर अंतरावर ब्रिटिश कालीन विहीर आहे, याच विहिरींचे पाणी पिण्यासाठी ग्रामस्थ वापर आहेत, पाण्याची समस्या दूर करण्यासाठी जलजीवन मिशन मधून पेजवाडी, फांगणे या २गावाला तब्बल८७लाख रुपयांची योजना मंजूर झाली, यातून या विहिरीच्या बाजूला दुसरी नवीन विहीर २०२३मध्येखोदून बांधण्यात आली, तिला पाणी देखील भरपूर व स्वच्छ लागले आहे,यानंतर पेजवाडी व फांगणे गावात अडिज ची पाईपलाईन टाकण्यात आली, परंतु तीही जमिनीत पुरली नाही, ब-याच ठिकाणी ती उघड्या वरच आहे.गावात जिप पाणी पुरवठा विभागाच्या वतीने १५वा वित्त आयोग जिप स्तर१०टक्के टाईट फंड मधून ३लक्ष रुपये खर्चून कटडा व पाण्याची टाकी बसविण्यात आली परंतु अद्याप याच्या४नळाला पाण्याचा थेंब आला नाही, हे काम काही हजारांचे असावे मात्र पैसे खर्च३लाख रुपये दाखवले?तर या टाकीत पाणी येईलच कसे? कारण ना बोअरवेल ना नळ कनेक्शन, केवळ दिखावा म्हणून मागे पाईप उभी केल्याचा आरोप काळुराम आंबो केदार यांनी केला आहे.पेजवाडी मधील आदिवासी महिलांना पाण्यासाठी कोसो दूर भर उन्हात जावे लागते, गावाजवळ एक बोअरवेल तिला पाणी नाही, जलजीवन मिशन चे पाणी सोडा आम्हांला कोणत्याही योजनेचा लाभ मिळत नसल्याचे विठ्ठल खंडवी यांचे म्हणणे आहे. त्यामुळे हरघर नल नलसे जल दूरच राहिले सध्या आम्हाला दूषित पाणी प्यायला लागते,यामुळे कावीळ, सर्दी, ताप खोकला, असे आजार बळावू लागले आहे, या विहिरीत उगवलेली झाडी झुडपे,आजुबाजुला असलेले गवत, पाण्यात पडणारा कचरा, घाण, ऐवढ्या मोठ्या योजनेचे पंप हाऊस ,उघड्यावरचे पाईप, यात जाणारे जनावरांचे मलमूत्र, शेण, पेजवाडी मध्ये वन जमिनीवर पाण्याच्या टाकीसाठी खोदलेला खड्डा, ना रस्ता,? ना पाणी ?अशा गावाची ही ऐवढी खर्चिक योजना ठेकेदार व सरपंच याच्यांसाठी आहे का असा प्रश्न काळुराम केदार, अनंता केदार, भास्कर देशमुख, कमलाबाई तुपांगे, राहुल देशमुख, आदी ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे,






## गीतासार



**ज्ञानकर्मसंन्यासयोगः**

कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः । स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥ ४-१८ ॥

जो माणूस कर्मामध्ये अकर्म पाहील आणि अकर्मामध्ये कर्म पाहील, तो मनुष्यांमध्ये बुद्धिमान होय आणि तो योगी सर्व कर्मे करणारा आहे. ॥ ४-१८ ॥

यस्य सर्वे समारम्भाः कामसङ्कल्पवर्जिताः । ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पण्डितं बुधाः ॥ ४-१९ ॥

ज्याची सर्व शास्त्रसंमत कर्मे कामनारहित व संकल्परहित असतात, तसेच ज्याची सर्व कर्मे ज्ञानरूप अग्नीने जळून गेली आहेत, त्या महामनुष्याला ज्ञानी लोकही पंडित म्हणतात. ॥ ४-१९ ॥

त्यक्त्वा कर्मफलासङ्गं नित्यतृप्तो निराश्रयः । कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किञ्चित्करोति सः ॥ ४-२० ॥


जो मनुष्य सर्व कर्मांमध्ये आणि त्यांच्या फळांमध्ये आसक्ती पूर्णपणे टाकून तसेच सांसारिक आश्रय सोडून देऊन परमात्म्यात नित्यतृप्त असतो, तो कर्मांमध्ये उत्तमप्रकारे वावरत असूनही वास्तविक काहीच करत नाही. ॥ ४-२० ॥

निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः । शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ ४-२१ ॥

ज्याने अंतःकरण व इंद्रियांसह शरीर जिंकले आहे आणि सर्व भोगसामग्रीचा त्याग केला आहे, असा आशा नसलेला मनुष्य केवळ शरीरसंबंधीचे कर्म करीत राहूनही पापी होत नाही. ॥ ४-२१ ॥

# नियम पाळा अपघात टाळा!

गेल्या दहा वर्षात देशभरात झालेल्या अपघातात १५ लाख ३० हजारांहून अधिक अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाने ही आकडेवारी जाहीर केली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाच्या संकेत स्थळावर ही आकडेवारी उपलब्ध असून त्यानुसार सण २०१३ ते २०२३ या दहा वर्षात रस्ते अपघातात बळी पडलेल्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या स्थानावर उत्तर प्रदेश तर दुसऱ्या स्थानावर तामिळनाडू ही राज्ये आहेत. २०२० ते २०२४ या काळात राज्यातील ४५ पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत १ लाख ५९ हजार रस्ते अपघात झाले असून त्यात ७१ हजार लोकांचा मृत्यू झाला आणि लाखो लोक गंभीर जखमी झाले आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यासाठी ही आकडेवारी भूषणावह नाही. रस्ते अपघातात जर इतके लोक दरवर्षी मरण पावत असतील तर ती चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांशी मृत्यू हे २० ते ५० या वयोगटातील



आहे. याचाच अर्थ रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू हे तरुणांचे होत आहेत. ज्या तरुणांकडे देश भावी आधारस्तंभ म्हणून पाहत असतो तेच तरुण जर असे अकाली मृत्यू पावत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. केवळ सर्वसामान्य तरुणच नाही तर देशातील अनेक महनीय व्यक्तींचा मृत्यू देखील रस्ते अपघातात झाला आहे. तीन वर्षापूर्वी शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि मराठा समाजाचे नेते विनायक मेटे यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठा समाजाचीच नव्हे तर राज्याची मोठी हानी झाली. त्यांच्या अपघाती निधनातून राज्य सावरत नाही तोच टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांचे अपघाती निधन झाले. सायरस मिस्त्री यांचा गुजरातच्या अहमदाबादवरून मुंबईला जाणाऱ्या मार्गावर चारोटी जवळ सुर्या नदीच्या पुलावर अपघात झाला. सायरस मिस्त्री यांचे देशाच्या औद्योगिक विकासात महत्वाचे योगदान आहे. त्यांच्या निधनाने उद्योग विश्वात मोठी शोककळा पसरली होती. सायरस मिस्त्री, विनायक मेटे यांच्यासारख्या समाजातील महनीय व्यक्तींच्या अशा अकाली निधनाने समाजाचे मोठे नुकसान होत आहे. विनायक मेटे, सायरस मिस्त्री हे समाजातील महनीय व्यक्ती आहेत म्हणून त्यांच्या निधनाची बातमी झाली. रस्ते अपघातात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो देशात सर्वात जास्त मृत्यू रस्ते अपघातात होतात. अपघातात जखमी आणि कायमचे जायबंदी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचा समावेश अधिक आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत त्याच तरुणांचे अपघातात निधन होत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. अनेक प्रयत्न करूनही देशातील रस्ते अपघातांची संख्या का कमी होत नाही हा संशोधनाचा विषय आहे. वाढत्या रस्ते अपघातांना जितकी व्यवस्था जबाबदार आहेत तितकीच मानवी चुकाही जबाबदार आहेत. टोलच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात असतानाच महामार्गावर जीवघेण्या ब्लॅकस्पॉट मध्ये सुधारणा होत नाही. त्याचप्रमाणे रस्त्यांवरील खड्डे, धुळीचे साम्राज्य, महामार्गावरील अतिक्रमणे, सर्व्हिस रोडचा अभाव, रस्त्यावरच उभी केली जाणारी अवजड वाहने, बंद पडलेल्या वाहनांसाठी कमी पडत असलेली मदत केंद्रे, मोकाट जनावरे, अपुरे दुभाजक याबाबी अपघातांसाठी कारणीभूत ठरत आहेत. महामार्गावर वाहन चालकांकडून वेग मर्यादा पाळण्यात येत नाही. बहुतेक प्रवासी १०० किमी पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवतात. ट्रक व इतर मोठ्या वाहनांकडून लेनची शिस्त पाळली जात नाही. काही वाहन चालक तर दारु पिऊन वाहने चालवतात तर काही वाहन चालक वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलतात. वाहनांची व्यवस्थित निगा न राखणे, सीट बेल्ट न लावणे या गोष्टीही अपघातास कारणीभूत ठरतात. नियम माहीत असूनही चालक त्यांचे पालन करत नाहीत. सगळ्यांनाच कमी वेळात आपले ठिकाण गाठायचे असते. नियमांचे पालन न केल्यानेच अपघातांची संख्या कमी होत नाही. अपघातांची संख्या कमी करायची असेल तर वाहन चालकांना नियमांचे पालन करावेच लागेल. नियम पाळा अपघात टाळा!

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## केडीएमसीतर्फे 'ऊर्जा- उत्सव उन्नतीचा' महिला दिनाचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : 8 मार्च रोजी दरवर्षी कल्याण डोंबिवली महापालिकेमार्फत हापालिकेच्या नाट्यगृहात विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन महिला दिन साजरा केला जातो. यावर्षी मात्र महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांच्या संकल्पनेनुसार या पारंपारिक पध्दती ऐवजी "ऊर्जा-उत्सव उन्नतीचा" या टॅग लाईनखाली कल्याण डोंबिवली महानगरपालिका व सिटी पार्क मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी एका आगळयावेगळया अभिनव पध्दतीने महिला दिनाचे आयोजन कल्याणच्या गौरी पाडा येथील सिटी पार्कच्या निसर्गरम्य वातावरणात सायं. 5 ते रात्री 9 या वेळेत करण्यात आले आहे.

8 मार्च, रोजी महिला दिनी सायं. 5 वाजता सिटी पार्कमध्ये प्रवेशोत्सुक महिलांचे अभ्यागतांचे गुलाब पुष्प देवून स्वागत केले जाईल. महिलांसाठी नेल आर्ट, मेहंदी यांचे विनामुल्य स्टॉल्स उपलब्ध राहणार आहेत. त्याचप्रमाणे महिलांसाठी हिमोग्लोबीन, बोन डेन्सिटी, रॅन्डम शुगर या चाचण्या तज्ञ डॉक्टरांमार्फत निशुल्क करण्यात येणार असून, हिमोग्लोबीनच्या कमतरतेसाठी औषधे देखील पुरविली जाणार आहेत. महिलांसाठी झुंबा डान्स आणि योगाचे तसेच नृत्याचे देखील सादरीकरण केले जाणार असून "आई आणि मुलगी" यांच्या जोडगोळीचा रॅम्प वॉक देखील आयोजित करण्यात आलेला आहे. इतकेच नव्हे महिलादिनी कार्यक्रमाची रंगत वाढविण्यासाठी लाईव्ह म्युझिकची देखील व्यवस्था करण्यात आली आहे.

यावेळी उपस्थित तज्ञ डॉक्टरांची महिलांच्या आरोग्य विषयक बाबींबाबत प्रकट मुलाखत घेतली जाणार आहे. तसेच आरोग्य समस्यांविषयक संबंधित डॉक्टर वर्गास प्रश्न विचारण्याची संधी देखील निवडक महिलांना प्राप्त होणार आहे. या कार्यक्रमात "आर्ट ऑफ लिविंग" बाबत महापालिकेच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे उपस्थितांना मार्गदर्शन करणार असून, कल्याण-डोंबिवली नगरीतील वेगवेगळया क्षेत्रात उल्लेखनिय काम केलेल्या काही महिलांना सन्मानित केले जाणार आहे.

महिलांसाठी आकर्षक सेल्फी पॉईंटस् उभारण्यात येणार असून, क्षुधाशांतीसाठी विविध खाद्य पदार्थ्यांच्या स्टॉल्सची रेलचेल असणार आहे. पै फ्रेन्डस् वाचनालयामार्फत महिलांशी निगडीत विषयांबाबत पुस्तक प्रदर्शनाचे देखील आयोजन या ठिकाणी करण्यात येणार आहे. यावेळी महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ उपस्थित महिलांना संबोधित करणार आहेत.

जागतिक महिला दिनी संपन्न होणाऱ्या या "ऊर्जा- उत्सव उन्नतीचा" अर्थातच महिला दिनाच्या कार्यक्रमाला आवर्जुन उपस्थित राहून, महिलांनी सहभागी होवून कार्यक्रमाचा आनंद लुटावा, असे आवाहन महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत करण्यात आले आहे.

## खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते कल्याण पूर्वेतील शिवसेना शाखेचे उद्घाटन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शिवसेना जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे आणि शिवसेना शहरप्रमुख निलेश शिंदे, यांच्या मार्गदर्शना खाली कल्याण पूर्व येथील चिंचपाडा येथे शिवसेना माजी नगरसेवक तथा विधानसभा प्रमुख प्रशांत काळे आणि माजी नगरसेबिका व शिवसेना महिला उपजिल्हा संगठक माधुरी काळे यांच्या पुढाकाराने व विभागप्रमुख सत्यवान खेडेकर यांच्या विशेष सहकाऱ्याने शाखा क्रमांक ९८ - चिंचपाडा रोड - विजयनगरचे शाखाप्रमुख विशाल वाघमारे आणि विभाग समन्वयक महेद्र एटमे व शाखाप्रमुख प्रदिप तांबे यांनी नव्याने सुरू करण्यात आलेल्या शाखेचे कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आले.



यावेळी उपशहर प्रमुख नवीन गवळी, महिला विभागसंगठक ज्योती अनेराव, महिला शाखा संगठक अश्विनी दवंडे, शाखाप्रमुख आमराई वासुदेव कदम, विभागप्रमुख संतोष साळवी, विभाग संघटक दिलीप कोल्हे, प्रशांत मांजरेकर यांच्यासह शिवसेना पधादिकारी आणि कार्यकर्ते, परिसरातील नागरिक उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री आणि आताचे उपमुखमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्री विशेष निधीतून उभारण्यात आलेल्या श्री मोरया प्रतिष्ठानच्या गणेश सभा मंडपाचे देखील यावेळी उद्घाटन पार पडले. या प्रसंगी मोठ्या संखेने मोरया प्रतिष्ठानचे पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते. यावेळी नव्याने सुरू करण्यात आलेल्या शिवसेना शाखेच्या माध्यमातून अधिकाधिक नागरिकांचे प्रश्न कसे मार्गी लावता येतील याबाबत सर्वांनी प्रयत्नशील रहावे असे आवाहन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सर्व स्थानिक शिवसैनिकांना केले. यावेळी शिवसेना स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केडीएमसीला अंधारात ठेवून स्टेम प्राधिकरणाचे काम

### केडीएमसीचे ना हरकत पत्र घेईपर्यंत स्टेमचे काम बंद करण्याची भाजपाची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या "अ" प्रभाग क्षेत्रात मोहने पंप हाऊस शेजारी स्टेम प्राधिकरण कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला अंधारात ठेवून प्रकल्प करत असून हे काम करण्यासाठी केडीएमसीकडून कोणतेही ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले नाही. त्यामुळे केडीएमसीचे ना हरकत पत्र घेई पर्यंत स्टेम प्राधिकरणाचे काम थांबविण्याची मागणी भारतीय जनता पार्टीने केली आहे. याबाबत भाजपाचे मोहने टिटवाळा मंडळ सचिव सुशीलकुमार पायाळ यांनी केडीएमसी आयुक्तांना पत्र दिले आहे. कल्याण-डंबिवली महानगरपालिकेच्या १"अ" प्रभाग क्षेत्रातील मोहने पंप हाऊस शेजारी उल्हास नदीवर



स्टेम प्राधिकरण ठाणे महानगरपालिका तसेच मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठ्यासाठी प्रकल्प राबवत आहे. परंतु प्रकल्प राबवत असताना स्थानिक पालिका प्रशासनाला स्टेम प्राधिकरणाने अवगत करून देणे अपेक्षित होते. स्टेम प्राधिकरणाने कुठल्याही प्रकारे अद्याप पर्यंत प्रकल्पा बाबत एकही पत्र कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला दिलेले नाही. तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कुठल्याही अधिकाऱ्याला प्रकल्पाबाबत लेखी स्वरूपात अवगत करून दिलेले नाही.

स्टेम प्राधिकरणाचा प्रकल्प केडीएमसी हद्दीत येत असल्याने भविष्यात प्रकल्पाच्या ठिकाणी कुठल्याही प्रकारचा अपघात झाल्यास किंवा कुठलीही आपत्ती आल्यास सर्वप्रथम विचारणा आयुक्तांना होईल. त्यामुळे या प्राधिकरणाला तात्काळ कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची ना हरकत घेणे कामी सुचित करून प्रकल्पाबाबत संपूर्ण माहिती

**भाजपाचे मोहने टिटवाळा मंडळ सचिव सुशीलकुमार पायाळ यांचे केडीएमसी आयुक्तांना पत्र**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस उपलब्ध करावी. तसेच स्टेम प्राधिकरण जोपर्यंत कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाची ना हरकत प्राप्त करत नाही तोपर्यंत स्टेम प्राधिकरणास सुरू असलेले काम बंद करण्याचे आदेशित करावे. जेणेकरून उद्या कुठल्याही प्रकारचा अपघात किंवा आपत्ती निर्माण झाल्यास आपण आयुक्त म्हणून जबाबदार राहणार नाही असे सुशीलकुमार पायाळ यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

दरम्यान स्टेमच्या वतीने सुरू असलेल्या कामा संदर्भात केडीएमसी पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता अशोक घोडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, स्टेमच्या सुरू असलेल्या कामासंदर्भात आमच्या विभागाला पत्र प्राप्त नसून संदर्भीत परिसरातील स्थानिक स्वराज्य संस्था केडीएमसीला याबाबत, स्टेम, लघु पाटबंधारे विभागाने समन्वय साधण्याच्या दुष्टीकोनातून कळविणे गरजेचे आहे."

## आरोग्य

### नैसर्गिकपणे वाढवा व्हिटॅमिन D



तज्ज्ञ असं सांगत आहेत की सांगत आहेत की ज्यांच्या शरीरात व्हिटॅमिन डी ची कमतरता असते त्यांच्या शरीरात व्हिटॅमिन बी १२ आणि कॅल्शियम यांचीही कमतरता असते. ही कमतरता भरून काढण्यासाठी आठवड्यातून एक दिवस जेवण करणे टाळा आणि त्याऐवजी भरपूर प्रमाणात सलाड किंवा फळं खा. यामुळे शरीरातली व्हिटॅमिन डी ची कमतरता भरून निघण्यास मदत होईल. जर हे शक्य नसेल तर रोजच्या आहारात फळं आणि सलाडचे प्रमाण वाढवा.

हे उपायही करता येतील

१. इंटरनॅशनल सेंटर फॉर कॉस्मेटिक मेडिसिन यांनी मांडलेल्या अभ्यासानुसार शरीरातली व्हिटॅमिन डी ची कमतरता दूर करण्यासाठी मशरूम खाणे खूप फायदेशीर ठरते. त्यासाठी मशरूमचे वेगवेगळे पदार्थ आठवड्यातून दोन दिवस तरी नियमितपणे खायलाच पाहिजेत.

२. व्हिटॅमिन डी मिळविण्याचा सगळयात सोपा आणि अतिशय उत्तम पर्याय म्हणजे सकाळच्या कोवळया उन्हात ८ ते १० मिनिटे जाऊन बसा. यावेळी तुमच्या मानेला, पाठीला ऊन लागेल या पद्धतीने बसावे.

## सुभेदारवाडा शाळेत नैसर्गिक रंगांची कार्यशाळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी कोरड्या रंगपंचमीचे महत्व तसेच रासायनिक रंगांचा आपल्या शरीरावर घातक परिणाम होतो, ज्यामुळे आपल्याला तसेच निसर्गातील अनेक घटकांना हानी पोहचू शकते. त्यामुळे पर्यावरणपूरक रंगपंचमी साजरा करण्याचे आवाहन दरवर्षी करण्यात येते. पर्यावरणपूरक रंगांची निर्मिती कशी करायची असा प्रश्न सर्वांसमोर निर्माण होतो. यासाठी कल्याणमधील सुभेदार वाडा कट्टा आणि पर्यावरण दक्षता मंच यांच्या संयुक्त विद्यमाने नैसर्गिक रंगाची कार्यशाळा मोफत आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत निसर्गात सहज उपलब्ध असणाऱ्या विविध गोष्टींचा वापर करुन पर्यावरणपूरक रंग घरच्या घरी कसे बनवले पाहिजेत याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. ही कार्यशाळा शुक्रवार, ७ मार्च रोजी दुपारी २.३० वाजता सुभेदार वाडा शाळा, कल्याण (प) येथे होणार आहे.

## अवैध धंद्याविरोधात आमदारांची विधानसभेत कारवाईची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : शहरातील अवैध धंदे, अंमली पदार्थांची विक्री, सेवन व त्यामुळे वाढत चाललेले गुन्ह्यांचे प्रकार शहरात मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. यांना आवर घालण्यासाठी ही बाब अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार कुमार आयलानी यांनी तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित केला होता.

आमदार कुमार ऐलानी हे सातत्याने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना ना पत्र लिहून अवैध धंदे, अंमली पदार्थांची विक्री, सेवन आणि शहरातील वाढती गुन्हेगारी रोखण्याची मागणी करत होते. कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचे पाहून आमदारांनी हा विषय विधानसभेच्या अधिवेशनात तारांकित प्रश्न म्हणून प्राधान्याने उपस्थित करून याप्रकरणी हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. यासंदर्भात ठाणे जिल्ह्यातील या प्रश्नांवर सातत्याने कारवाई सुरू असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वतीने सांगण्यात आले. या विषयावर अधिक कडक कारवाई करून गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्याचे काम केले जाणार आहे.

## स्त्री रोग तज्ज्ञांचा विनामुल्य वैद्यकीय सल्ला

### डॉ अरुणा राठोड यांची जागतिक महिला दिनानिमित्त मैत्रीणीना भेट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : बदलत्या प्रदूषित वातावरणामुळे व धकाधकीच्या आयुष्यात स्त्रियांना अनेक आजारांना सामोरे जावे लागते. सध्या स्त्रियांमध्ये स्तनांचा आणि गर्भाशयाच्या कर्करोगाचे व ईतर आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. यांसारख्या अनेक विकारांच्या तपासणी व वैद्यकीय सल्ले हे तज्ञ डॉक्टरां कडून मिळवणे खूप महागडं झालंय. मात्र, अशा आर्थिक दुर्बल घटकांतील



निराधार, विधवा, परित्यक्ता स्त्रियांना याबाबत चे मोफत वैद्यकीय सल्ले आणि मार्गदर्शन देण्याची तयारी अंबरनाथ च्या सुप्रसिद्ध स्त्री रोगतज्ञ डॉक्टर अरुणा गणेश राठोड यांनी दर्शवली आहे.

गेल्या ३० वर्षांपासून रोटरी क्लब आणि तत्सम अनेक सामाजिक संस्थांशी संलग्न असणाऱ्या डॉ. अरुणा गणेश राठोड यांनी जागतिक महिला दिनानिमित्त हा संकल्प केलाय. अंबरनाथ पूर्व येथील अंबरनाथ मरीन ड्राईव्ह रोड, पटेल लो प्राईज शेजारी असणाऱ्या ' शिवकृपा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल ' मध्ये या डॉक्टर उपलब्ध असणार आहेत. अंबरनाथ विधानसभा क्षेत्रात वास्तव्य असणाऱ्या पतीने सोडून दिलेल्या, विधवा, तृतीयपंथी, निराधार जेष्ठ नागरिक अशा महिलांच्या प्रसुती, व स्त्री रोगांबद्दल केवळ मोफत सल्ला व मार्गदर्शन डॉ. अरुणा राठोड पुरवणार आहेत.

घर चालवण्यासाठी महिलांना कुटुंब आणि नोकरी, उद्योग करावे लागतात. यात त्यांच्या शरीराची मोठ्या प्रमाणात झीज होते. अशावेळी उत्पन्न होणाऱ्या आजारांची लक्षणे ओळखून वेळीच रोकथाम करणे गरजेचे ठरते. यासाठी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला हा आवश्यक असते. ज्या गरीब विधवा निराधार महिलांची तज्ञ डॉक्टरांना फी देऊन सल्ला घेण्याची ऐपत नाही अशा महिलांकरिता आपले सामाजिक दायित्व या नात्याने मी जागतिक महिला दिनाच्या निमित्त ही सेवा पुरून आत्मिक समाधान शोधण्याचे शोधत असल्याची प्रतिक्रिया यावेळी डॉक्टर अरुण राठोड यांनी व्यक्त केली.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# केईएम रुग्णालयात सहा वर्षात १ हजार १७६ अर्भकांचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** केईएम रुग्णालयामध्ये २०१९ पासून २०२४ पर्यंत १ हजार १७६ अर्भकांचा मृत्यू झाल्याचे उघडकीस आले आहे. केईएममध्ये मुंबईसह आसपासच्या परिसरातून मोठ्या प्रमाणात गर्भवती महिला प्रसूतीसाठी येत असतात. त्यामुळे इतक्या मोठ्या प्रमाणात अर्भकांचा मृत्यू होणे ही गंभीर बाब असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. दरम्यान, मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील सर्व रुग्णालयांमध्ये होणाऱ्या बालकांच्या मृत्यूबाबत रुग्णालय स्तरावर चौकशी करून पुढील मृत्यू टाळण्यासाठी योग्य ते प्रतिबंधक उपाय योजले जात असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

मुंबई महानगरपालिकेच्या केईएम रुग्णालयामध्ये मुंबईसह आसपासच्या परिसरातून मोठ्या प्रमाणात नागरिक उपचारासाठी येत असतात. प्रसूतीसाठी येणाऱ्या महिलांचे प्रमाणही अधिक आहे. मात्र केईएम रुग्णालयामध्ये २०१९ ते २०२४ या सहा वर्षांच्या कालावधीमध्ये नवजात शिशु विभागामध्ये १ हजार १७६ अर्भकांचा मृत्यू झाला आहे. २०१९ मध्ये २२५ अर्भकांचा मृत्यू झाला असून, २०२० मध्ये २०६, २०२१ मध्ये १७९, २०२२ मध्ये १८८, २०२३ मध्ये १७९ व २०२४ मध्ये १९९ अशा एकूण १ हजार १७६ अर्भकांचा मृत्यू झाला आहे. अर्भकांचा मृत्यू होण्यामागील प्रमुख कारणांमध्ये मातेचे वजन कमी असणे, प्रसूतीपूर्वी झालेला संसर्ग, प्रसूतीदरम्यान झालेली गुंतागुंत, बाळाला प्राणवायूचा पुरवठा पुरेसा न होणे अशी महत्त्वाची कारणे असल्याचे प्रसूती तज्ज्ञांकडून सांगण्यात आले. मात्र केईएम रुग्णालयामध्ये सहा वर्षांमध्ये १ हजार १७६ अर्भकांचा मृत्यू होणे ही गंभीर बाब असल्याचा मुद्दा आमदार सुनील शिंदे यांनी विधान परिषदेमध्ये उपस्थित केला होता.

यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लेखी उत्तरामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेल्या सर्व रुग्णालयांमध्ये होणाऱ्या अर्भकांच्या मृत्यूबाबत रुग्णालय स्तरावर चौकशी करण्यात येत आहे. तसेच अर्भकांचा मृत्यू टाळण्यासाठी योग्य ते प्रतिबंधक उपाय योजण्यात येत आहेत. तसेच, गरोदर महिलांच्या सर्वंकष आरोग्याच्या दृष्टीने योग्य समयी नाव नोंदणी करणे, त्यांना औषधोपचार व आहार पुरविणे, त्यांचे समुपदेशन करण्यात येत असल्याचे सांगितले.




2019 २२५ अर्भकांचा मृत्यू
2020 २०६ अर्भकांचा मृत्यू
2021 १७९ अर्भकांचा मृत्यू
2022 १८८ अर्भकांचा मृत्यू
2023 १७९ अर्भकांचा मृत्यू
2024 १९९ अर्भकांचा मृत्यू



# नवी मुंबईत भंगार खरेदी टोळ्यांची दहशत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** नवी मुंबईलगत असणाऱ्या औद्योगिक वसाहतीमधील हजारो कंपन्यांतून टनांवारी निघणारे भंगार खरेदी करणाऱ्यांची दादागिरी पूर्वीपासून सुरू आहे. आता ही प्रकरणे पोलीस ठाण्यापर्यंत पोहचत आहेत. आठवडाभरात दोन गुन्हे दाखल झाले आहेत. त्यामुळे भंगार खरेदी विक्री टोळ्यांची दहशत, त्यातून गुन्हेगारी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

औद्योगिक वसाहतीत साडेतीन चार हजाराच्या घरात लहान-मोठे कारखाने आहेत. त्यातील अनेक कारखान्यांतून ठरावीक दिवसांनी टाकाऊ माल अर्थात भंगार मोठ्या प्रमाणात निघते. भंगार खरेदी विक्रीची वर्षाला कोट्यवधींची उलाढाल होत असते. यात अनेक वर्षांपासून गुन्हेगारी प्रवृत्ती व्यक्तींनी प्रवेश केला आहे.



२४ फेब्रुवारीला ओरिएंटेल विविंड अँड प्रोसेसिंग कंपनीत भंगार खरेदी वरून राडा झाला होता. या कंपनीतील भंगार साहित्य एस. के. एंटरप्राइज नावाच्या भंगार खरेदी करणाऱ्या कंपनीला विकले. हे भंगार ट्रकमध्ये भरून बाहेर नेले जात असताना रुपेश आणि अनिल यांनी काही साथीदारांच्या मदतीने हे ट्रक रोखले. शेवटी एस. के. एंटरप्राइजचे कमाल खान यांच्याकडून साडे नऊ हजार रुपये जबरदस्तीने घेतल्यावर सर्व संशयित निघून गेले. या प्रकरणी तुर्भे एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा नोंद झाला होता. हे प्रकरण ताजे असतानाच सोमवारी असाच प्रकार घडला. महापे येथील भूखंड क्रमांक ३५२ येथे एक कंपनी असून व्यवसायाने माथाडी कामगार असलेले सूरज शेवाळे हे साथीदारांसह तेथे आले. त्यांनी भंगार सामान दुसऱ्याला का देतात असा जाब विचारला. याचे पर्यवसान हाणामारीत झाले. या प्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# उरण तालुक्यात पर्यटकांची सुरक्षा वाऱ्यावर



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** तालुक्यातील महत्वाच व पर्यटकांना आकर्षित करणारे ठिकाण असलेल्या पिरवाडी किनाऱ्यावर सुरक्षेसाठी व्यवस्था करण्याची मागणी आता होऊ लागली आहे. शासनाने महसूल विभागाच्या माध्यमातून पर्यटक आणि किनाऱ्यावरील हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी उभारलेला टेहळणी मनोरा कोसळला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा किनाऱ्याच्या सुरक्षेचा प्रश्न उभा राहिला आहे. उरण तालुका हा औद्योगिक शहर आहे. त्यामुळे तालुक्या बाहेरून येणाऱ्या अनेक पर्यटकांची संख्या वाढू लागली आहे. सुट्टीच्या आणि इतरही दिवशी मोठ्या संख्येने स्थानिक आणि पर्यटक पिरवाडी किनाऱ्यावर येतात. अनेक पर्यटक हे समुद्रात पोहण्याचा प्रयत्न करीत आहेत. यावेळी पर्यटक आणि नवख्यांना समुद्राचा अंदाज न आल्याने अपघात होण्याची शक्यता असते. अशा प्रकारच्या घटना याआधी किनाऱ्यावर घडल्या आहेत. यानंतर शासनाने किनारा सुरक्षेची काही नियमावली ठरविली आहे. यात सुरक्षा रक्षक व त्याच्यासाठी लागणारे साहित्य उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे.

किनाऱ्यावर सुरक्षेसाठी नवी मुंबई किनारा पोलीस व रायगड सुरक्षा रक्षक तैनात आहेत. मात्र त्यांची संख्या अपुरी आहे. यातही वाढ करण्याची मागणी स्थानिकाकडून केली जात आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून पिरवाडी किनाऱ्यावर धूप प्रतिबंधक बंधारा उभारला आहे. मात्र या बंधाऱ्याचे दगड ही निखळू लागले आहेत

# भिवंडी महापालिका क्षेत्रात आरोग्य, स्वच्छता आणि सेवा शिबिरांचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्र शासनाच्या दि. १३/०१/२०२५ रोजीच्या शासन निर्णया नुसार महानगरपालिकेत १०० दिवसांचा कृती आरखडा , राबविण्याचे सूचने नुसार भिवंडी नि.श. महानगरपालिकेचे मा.आयुक्त तथा प्रशासक श्री. अनमोल सागर साहेब,व मा. अतिरिक्त आयुक्त श्री. देविदास पवार साहेब , श्री.विठ्ठल डाके साहेब तसेच उपयुक्त श्री शिरसागर साहेब तसेच मा मुख्य वैद्यकीय अधिकारी श्रीमती. बुशरा शेख मॅडमयांच्या मार्गदर्शनाने नुसार व श्रीमती डॉ. स्वाती सिंह (अध्यक्ष) श्री. साई सेवा संस्था यांच्या सहकार्याने तसेच मा. सहा.आयुक्त श्री. सुरेंद्र भास्कर भोईर यांच्या अधिपत्याखाली प्रभाग समिती क्र.3 च्या कार्यक्षेत्रातील रेड लाईट ( देह व्यवसाय) एरिया हनुमान टेकडी येथील श्री. साई सेवा संस्था यांचे कार्यालय मध्ये आरोग्य शिक्षण स्वच्छता व पर्यावरण याविषयी मोफत मेडिकल चेकअप आभाकार्ड आयुष्मान कार्ड इत्यादी सेवा देण्याकरिता शिबिर आयोजित करण्यात आले, सदर कार्यक्रमात प्रभाग समिती क्रमांक 3 चे कार्यालयीन अधीक्षक किशोर पवार सहाय्यक कार्यालयीन अधीक्षक, सर्वेश चव्हाण, बिट निरीक्षक श्री सुरज गायकवाड तसेच नारायण पाटील, सुजित भोईर, इंद्रपाल जाधव, जयेश जाधव, यांच्या सहाय्याने सदरचा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यात आला.





# मीरा-भाईंदरकरांना मुद्रांक शुल्क अधिभाराचा भुर्दंड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**जकात बंद करून स्थानिक संस्था कर वसुलीसह १ टक्का मुद्रांक शुल्क वसुली २०१० पासून सुरू करण्यात आली होती. मात्र, स्थानिक संस्था करही बंद झाला व जीएसटी लागू झाली. पण, व्यापाऱ्यांकडून जकात व एलबीटी वसुलीऐवजी सरसकट सुरू केलेला १ टक्का मुद्रांक शुल्क अधिभार राज्यातील पालिका क्षेत्रात घर, मालमत्ता खरेदी करणाऱ्या नागरिकांकडून आजही वसूल केला जात आहे. १ टक्का अधिभार आणि ५ टक्के जीएसटी अशी दुहेरी वसुली केली जात आहे. एकट्या मीरा-भाईंदर पालिकेला १ टक्का मुद्रांक शुल्क अधिभारापोटी २०१५-१६ ते २०२४-२५ या १० वर्षांत तब्बल ५२४ कोटी २८ लाख ९३ हजार रुपये मिळाले आहेत. २०१७-१८ पासून पालिकेला जीएसटी अनुदान मिळत असून, त्यातही घर, मालमत्ता खरेदीवरील जीएसटीचा समावेश आहे.**

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका,**
**कल्याण**

## जाहिर सूचना

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील सेक्टर क्र. ३ मधील मौजे - गौरीपाडा येथील बिर्लास्कुल - कॉलेज ते गौरीपाडा तलावापर्यंत ( नकाशात हिरव्या रंगाने दर्शविल्या प्रमाणे A - B ) मंजुर विकास योजनेतील १५.०० मी. रुंद रस्ता विद्यमान रस्त्याच्या तसेच यापूर्वी प्रदान केलेल्या बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विकसित करण्याचा महापालिकेचा मानस आहे.

ज्याअर्थी,सदरच्या रस्त्याचे प्रत्यक्ष जागेवरील सर्वेक्षण करण्यात आले असुन सर्वेक्षण नकाशावर सदर विद्यमान रस्ता सरासरी ५.०० मी. ते ६.०० मी. रूंदीचा व साधारण १५०.०० मी. लांबीचा आजमितीस उपलब्ध आहे. विद्यमान रस्ता उपलब्ध आहे. सदर परिसरातील दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या, तसेच त्याप्रमाणात वाढणारी वाहतुक व आरोग्य सेवा इत्यादी बाबीचा विचार करुन जनहिताच्या दृष्टीने उक्त १५.०० मी. रूंद रस्ता (नकाशात हिरव्या रंगाने दर्शविल्याप्रमाणे A - B) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विकसित करण्याचा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा मानस आहे. सदरच्या रस्त्याच्या दोन्हीकडील रुपरेषा मा. आयुक्त महोदया यांनी विहीत केलेली आहे.

ज्याअर्थी, या जाहिर सुचनेव्दारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० मधील तरतुदीनुसार सदर परीसरातील तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व नागरीकांना या जाहिर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, उक्त १५.०० मी. रूंद रस्ता ( नकाशात हिरव्या रंगाने दर्शविल्याप्रमाणे A— B) महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील सर्वेक्षण केलेल्या नकाशाप्रमाणे विहित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० प्रमाणे कोणीही वरील प्रमाणे विहित केलेल्या सदर रस्त्याच्या रेषेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू शकणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

१) नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांका पासुन एक महिन्याच्या मुदतीत आपल्या सुचना व हरकती असल्यास मा. प्रशासक तथा आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका द्वारा सचिव, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांचेकडे लेखी स्वरूपात दयाव्यात.

२) सदर नोटीस व नकाशाची प्रत नागरिकांच्या माहितीसाठी नगररचना विभाग मुख्यालय नोटीस बोर्डवर व " २ / ब प्रभाग क्षेत्र" कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आली आहे.

**सही /-**
**(सुरेंद्र टेंगळे)**
**प्र. सहाय्यक संचालक नगररचना**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

**जा. क्र. कडोंमपा/जसंवि/मुका/२५२**
**दिनांक- ०६/०३/२०२५**

# पालिका परिवहन सेवेत अडथळे आणणाऱ्यांवर कारवाई करा - आयुक्त मनीषा आव्हाळे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** महापालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी परिवहन विभागाची बैठक घेऊन महिला, वृद्ध व दिव्यांगाना तिकीट व पास सवलतीसाठी प्रस्ताव आणण्याचे आदेश दिले. तसेच बस निवारे, प्रवास निवारे बांधताना विरोध करणाऱ्यावरही कारवाईचे संकेत आयुक्तानी दिले. उल्हासनगर महापालिकेने शहर अंतर्गत व शेजारी शहरासाठी परिवहन बस सेवा सूरू केली. या बस सेवेचा दिव्यांग, महिला व वृद्धाना तिकीट व पास मध्ये सवलत मिळावी. यासाठी तत्काळ प्रस्ताव आणण्याचे आदेश मंगळवारी घेतलेल्या विभागाच्या बैठकीत आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी दिले.

तसेच शहरांत नियमितपणे प्रवासी व बस निवारे उभारताना विरोध होत असेल तर त्यावर कारवाईचे आदेश आयुक्तानी दिले. तिकीट तपासणी यावर आयुक्तानी जोर देऊन बस निवाऱ्यावर महापालिका विकास कामाच्या जनजागृतीसाठी जाहिराती लावण्याचे आदेश दिले.

शहरात विविध विकास कामामुळे रस्ते खोदण्यात आल्याने, एसी बस शहाड फाटक ते टिटवाळा दरम्यान चालविण्याच्या सूचना दिल्या आहेत. बैठकीला परिवहन बस विभागाचे विनोद केणे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. आयुक्तांनी महिला, वृद्ध व दिव्यांग आदिना तिकीट व पास मध्ये सवलत देण्याचा प्रस्ताव मागितल्याने, लवकरच बस मध्ये महिला, वृद्ध व दिव्यांगाना सवलत मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी**
**बांधकाम विभाग प्र. स. क्र. - ०२**

## ई-निवीदा सुचना क्र.१६३/२०२४-२५

भिवंडी नि. शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत खालील नमुद कामाचे निविदा फॉर्म mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०७/०३/२०२५ ते दि. २१/०३/२०२५ पर्यंत विक्रिस उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदापत्रकिय रक्कम |
|---|---|---|
| १ | भिवंडी पूर्व विधानसभा मतदार संघातील भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. २ वॉर्ड क्र. ९ एहबाब हॉटेल जवळ विविध ठिकाणी नागरी सुविधा पुरविणे. | ६,९९,३०७/- |

वरील ऑनलाईन निविदा दि. २१/०३/२०२५ पर्यंत दुपारी ४.०० पर्यंत स्विकारण्यांत येतील. तसेच सदरची निविदा ही दि. २४/०३/२०२५ रोजी संध्या. ४:०१ वाजता अथवा कार्यालयीन कामकाजाच्या सोयीप्रमाणे निविदा समिती समक्ष उघडण्यांत येईल.

अधिक माहिती महानगरपालिकेच्या उक्त नमुद संकेत स्थळावरुन प्राप्त होऊ शकेल; अथवा नविन शासकिय इमारतीमधील ५ व्या मजल्यावरील बांधकाम विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

सही/-
(जमील पटेल)
शहर अभियंता,
भि.नि.शहर महानगरपालिका, भिवंडी

*जावक क्रमांक : जनसंपर्क विभाग/219/दि.06.03.2025

# 'ऊर्जा-उत्सव उन्नतीचा' या टॅग लाईन खाली केडीएमसीमार्फत महिला दिनाचे आयोजन !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** दिनांक 8 मार्च रोजी दरवर्षी महापालिकेमार्फत महापालिकेच्या नाट्यगृहात विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन महिला दिन साजरा केला जातो. यावर्षी मात्र महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांच्या संकल्पनेनुसार या पारंपारिक पध्दती ऐवजी "ऊर्जा-उत्सव उन्नतीचा" या टॅग लाईनखाली कल्याण डोंबिवली महानगरपालिका व सिटी पार्क मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. 08 मार्च, 2025 रोजी एका आगळयावेगळया अभिनव पध्दतीने महिला दिनाचे आयोजन कल्याणच्या गौरी पाडा येथील सिटी पार्कच्या निसर्गरम्य वातावरणात सायं. 5.00 ते रात्री 9.00 या वेळेत करण्यात आले आहे.दि. 08 मार्च, 2025 रोजी महिला दिनी सायं. 5.00 वाजता सिटी पार्कमध्ये प्रवेशोत्सुक महिलांचे/ अभ्यागतांचे गुलाब पुष्प देवून स्वागत केले जाईल. महिलांसाठी नेल आर्ट, मेहंदी यांचे विनामुल्य स्टॉल्स उपलब्ध राहणार आहेत. त्याचप्रमाणे महिलांसाठी हिमोग्लोबीन, बोन डेन्सिटी, रॅन्डम शुगर या चाचण्या तज्ञ डॉक्टरांमार्फत निशुल्क करण्यात येणार असून, हिमोग्लोबीनच्या कमतरतेसाठी औषधे देखील पुरविली जाणार आहेत.महिलांसाठी झुंबा डान्स आणि योगाचे तसेच नृत्याचे देखील सादरीकरण केले जाणार असून "आई आणि मुलगी" यांच्या जोडगोळीचा Ramp Walk देखील आयोजित करण्यात आलेला आहे. इतकेच नव्हे महिलादिनी कार्यक्रमाची रंगत वाढविण्यासाठी लाईव्ह म्युझिकची देखील व्यवस्था करण्यात आली आहे.यावेळी उपस्थित तज्ञ डॉक्टरांची महिलांच्या आरोग्य विषयक बाबींबाबत प्रकट मुलाखत घेतली जाणार आहे. तसेच आरोग्य समस्यांविषयक संबंधित डॉक्टर वर्गास प्रश्न विचारण्याची संधी देखील निवडक महिलांना प्राप्त होणार आहे. या कार्यक्रमात " आर्ट ऑफ लिविंग" बाबत महापालिकेच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे उपस्थितांना मार्गदर्शन करणार असून, कल्याण-डोंबिवली नगरीतील वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनिय काम केलेल्या काही महिलांना सन्मानित केले जाणार आहे.महिलांसाठी आकर्षक सेल्फी पॉईंटस् उभारण्यात येणार असून, क्षुधाशांतीसाठी विविध खाद्य पदार्थ्यांच्या स्टॉल्सची रेलचेल असणार आहे. पै फ्रेन्डस् वाचनालयामार्फत महिलांशी निगडीत विषयांबाबत पुस्तक प्रदर्शनाचे देखील आयोजन या ठिकाणी करण्यात येणार आहे. यावेळी महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ उपस्थित महिलांना संबोधित करणार आहेत.जागतिक महिला दिनी दि. 08 मार्च 2025 रोजी संपन्न होणाऱ्या या "ऊर्जा- उत्सव उन्नतीचा" अर्थातच महिला दिनाच्या कार्यक्रमाला आवर्जुन उपस्थित राहून, महिलांनी सहभागी होवून कार्यक्रमाचा आनंद लुटावा, असे आवाहन महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत करण्यात येत आहे.

# हवामान बदलाने हापूस उत्पादनात घट



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** एपीएमसी बाजारात यावर्षी हापूस हंगाम सुरळीत राहील अशी अपेक्षा होती, परंतु ऐन फळधारणेच्या कालावधीत हापूसच्या उत्पादनावर संक्रात ओढावली. पाऊस, हवामान बदल, तसेच कडाक्याच्या थंडीने आंब्यांवर परिणाम झाला असून उत्पादन घटले आहे. त्यामुळे यंदा ३५ ते ४० टक्के उत्पादन असेल अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे.समाधानकारक पाऊस पडत आहे, त्यामुळे हापूस उत्पादन चांगले असेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत होती, मात्र दुसरीकडे वेळोवेळी हवामानात होणाऱ्या बदलाचा फटका आंब्याला बसला. त्यामुळे अपेक्षित जादा उत्पादनात घट होताना दिसत आहे.

मागील वर्षी बाजारात फेब्रुवारी महिन्यात लवकर आवक सुरू झाली होती. तर मार्च मध्ये हंगाम सुरू झाला होता, मार्च मध्ये ४० ते ५० हजार पेट्या दाखल होत होत्या. यावेळी मात्र मोठ्या संख्येने दाखल होणाऱ्या आंब्यात घट होऊन कमी हापूस दाखल होत आहे.फेब्रुवारीमध्ये एक दिवस आड कोकणातील हापूसच्या पेट्या दखल होत होत्या तर सध्या बाजारात आता तीन ते साडेतीन हजार पेट्या दाखल होत आहेत. त्यामुळे यावर्षी हापूसचा हंगाम अवघा ३५ ते ४० टक्के आहे. तसेच मे अखेर पर्यंत सुरू असणारा हंगाम लवकर संपुष्टात येणार आहे.

एरव्ही ३ ते ४ महिने हंगाम सुरू असतो, यंदा मात्र २० मार्च ते एप्रिल अखेर तसेच काही तुरळक आवक १०मे पर्यंत राहील असे मत घाऊक फळ व्यापारी संजय पिंपळे यांनी व्यक्त केले आहे. सध्या बाजारात रत्नागिरी, देवगडचा,रायगडचा हापूस दाखल होत असून ४-६ डझनाच्या पेटीला ३हजार ते ६हजार रुपये दराने विक्री होत आहे.

कोट – यंदा उत्पादन केवळ ३५ ते ४० टक्के आहे. कडाक्याची थंडी , हवामान बदल आणि पाऊस यामुळे उत्पादनाला फटका बसला आहे. उष्णता वाढल्याने दर्जावर परिणाम होत आहे.अशा हवामान बदलाच्या परिस्थितीत आंबा उत्पादकांना उत्पादन काढणे आव्हानात्मक ठरत आहे.चंद्रकांत मोकाल, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक महा संघ वेळोवेळी हवामानात होणाऱ्या बदलाचा फटका आंब्याला बसला. त्यामुळे अपेक्षित जादा उत्पादनात घट होताना दिसत आहे. मागील वर्षी बाजारात फेब्रुवारी महिन्यात लवकर आवक सुरू झाली होती. यावेळी मात्र आंब्यात घट होऊन कमी हापूस दाखल होत आहे.

# शिक्षण विभागाचे कामकाज ऑनलाईन करणार- मंत्री दादाजी भुसे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / मुंबई : शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहाव्या वेतन आयोगाचे प्रलंबित हप्ते देण्याबाबत शासन निर्णय १२ जून २००९ आणि १७ फेब्रुवारी २०२१ अन्वये आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत. अमरावती विभागातील उशिराने एनपीएस क्रमांक घेतलेल्या एकूण १०८ कर्मचाऱ्यांचे सहाव्या वेतन आयोगाचे हप्ते अदा करण्याची कार्यवाही सुरू असून ही कार्यवाही ३१ मार्च पर्यंत पूर्ण करण्यात येईल. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अन्य अडचणी सोडविण्यासाठी शालेय शिक्षण विभागाचे कामकाज जास्तीत जास्त ऑनलाईन करण्याचा प्रयत्न असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधान परिषदेत सांगितले.

विधान परिषद सदस्य अभिजित वंजारी यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री जयंत आसगावकर, ज्ञानेश्वर म्हात्रे, सुधाकर आडबाले यांनी सहभाग घेतला. या प्रश्नाबाबत उत्तर देताना मंत्री श्री. भुसे म्हणाले, शिक्षकांचे प्रलंबित हप्ते देण्यासाठी एनपीएस अथवा डीसीपीएस चे खाते निवडणे आणि त्याचा क्रमांक प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे. शालेय शिक्षण विभागाशी संबंधित विविध कामे वेळेत पूर्ण झाली पाहिजेत यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगून नजिकच्या काळात विभागाच्या कामकाजात सकारात्मक बदल झाल्याचे दिसून येईल, असेही मंत्री श्री. भुसे यांनी यावेळी सांगितले.

## संक्षिप्त

### 'पुरणपोळी जाणिवेची' उपक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आपले सण साजरा करायचा खरा आनंद हा सामुदायिक सौख्यात आहे, असा विचार या तरुणांचा असून हे उद्दिष्ट समोर ठेवून एक पुरणपोळी जाणिवेची हा उपक्रम सुरु केला असल्याची माहिती अविरत थोडं सोशल या समुहातील मोहित जोशी या तरुणाने दिली. गेले अनेक वर्षे हा उपक्रम राबविला जात असून नागरिकांचा त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. संघ विचाराने प्रेरित होऊन प्रताप व्यायाम शाळा सेवा संस्था आणि अविरत थोडं सोशल यांच्या वतीने 'एक पुरणपोळी जाणिवेची २०२५' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. होळीच्या दिवशी म्हणजे १३ मार्च रोजी संध्याकाळी ४ ते ८ यावेळेत पुरणपोळ्या संकलित केल्या जाणार आहेत. संकलित झालेल्या पुरणपोळ्या समाजातील कष्टकरी नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांचा सण या उपक्रमातून गोड केला जाणार आहे. या उपक्रमात सहभागी कसे व्हाल ? - या उपक्रमात सहभागी होण्यासाठी गुरुवार, १३ मार्च रोजी सायंकाळी ४ ते ८ यावेळेत जाणिवेची एक पुरणपोळी प्रताप व्यायामशाळा, कै. वामनराव ओक रक्तपेढी मागे, सहयोग मंदिर पथ, नौपाडा, ठाणे (प.) येथे जमा करता येणार आहे. याठिकाणी केवळ पुरणपोळी स्विकारली जाईल. अन्य कोणतेही अन्नपदार्थ आणि आर्थिक मदत स्विकारली जाणार नाहिये. तसेच एका घरातून एकच पुरणपोळी अपेक्षित आहे. अधिक माहितीसाठी ९३७२९६६५१० या क्रमांकावर संपर्क साधावा.

### आजीबाई शाळा दशक पूर्ती सोहळ्याचे आयोजन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील जगप्रसिद्ध आजीबाई शाळा फांगणे या शाळेची सुरुवात ८ मार्च २०१६साली कै.इंदुमती मोतीराम दलाल यांच्या शुभहस्ते फांगणे येथे झाली. त्यांच्या च प्रयत्नांतून फांगणे गावात घरोघरी नळ योजना राबविण्यात आली होती.कै.मोतीराम गणपत दलाल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष दिलीप भाई दलाल यांच्या माध्यमातून ही शाळा गेली दहा वर्षे आजीबाईंना ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत आहे.या आजीबाईंना शिकवण्याचे कार्य सौ. शितल प्रकाश मोरे करत आहेत तसेच शाळेसाठी स्वतःची जागा ही प्रकाश लक्ष्मण मोरे यांनी दिली आहे . आजीबाई शाळेला आतापर्यंत २५ हून अधिक परदेशी नागरिकांनी भेट दिली असून अमेरिका , रशिया, जपान, जर्मनी, कॅनडा,फ्रान्स, स्वित्झर्लंड, बांगलादेश, इंग्लंड या देशातील पत्रकारांमळे जागतिक कीर्ती शाळेला प्राप्त झाली आहे.कौन बनेगा करोडपती, इंडियन आयडॉल,बरखा दत्त शो, आकाशवाणी, दूरदर्शन, विविध चॅनेल यांनी विशेष प्रसिध्दी दिली आहे आजीबाई शाळा दशक पूर्ती निमित्त विविध प्रकारचे सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत. स्नेह परिवार मुंबई टीमचे समाज सेवक अशोक वायकूल प्रसिद्ध दानशूर उद्योगपती रामकृष्ण कोलवणकर व त्यांचे सर्व सदस्य सहभागी होत आहेत महागणपती हास्पिटल टिटवाळा यांच्या तर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर व औषध उपचार केले जाणार आहेत शाळेच्या यशात शिवतेज मित्रमंडळ व ग्रामस्थ मंडळ फांगणे गावाचे खूप मोठे योगदान असल्याचे लेखक इतिहास संशोधक, शाळेचे व्यवस्थापक योगेंद्र बांगर यांनी सांगितले

आजीबाईंचे कौतुक करण्यासाठी सर्वानी या दिमाखदार सोहळ्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष दिलीप दलाल यांनी केले आहे

# जागतिक महिला दिनी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा होणार सत्कार

## जिल्ह्यात सर्व ग्रामपंचायतींमध्ये महिलांचा सन्मान करण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांचे आवाहन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे - संपूर्ण देशात 8 मार्च रोजी 'जागतिक महिला दिन' साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभाग, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, उमेद अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यावेळी पाणी व स्वच्छतेबाबत गावात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या सर्व गटविकास अधिकारी यांच्या माध्यमातून ग्रामपंचायतींना निर्देश देण्यात आले आहेत. सर्व ग्रामपंचायतींनी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

त्यानुसार सर्व ग्रामपंचायतीमध्ये अंमलबजावणी सहाय्य संस्था म्हणून निवड झालेले ग्राम संघातील सर्व महिलांची जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी विशेष स्वच्छता धाव (वॉश रन) आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये उमेद अंतर्गत बचत गटातील महिला, किशोरवयीन मुली / विद्यार्थीनी, स्वच्छता कर्मचारी, पाणी व स्वच्छता समितीचे सदस्य, ग्रामपंचायत सदस्य आणि समुदयातील प्रभावशाली लोकांचा समावेश करून पाणी, स्वच्छता व आरोग्य संबंधित संदेशाद्वारे जनजागृती करण्यात येणार आहे.

ठाणे जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष महिला सभेचे आयोजन करण्यात येणार आहे. सभेत पाणी, स्वच्छता व आरोग्य संबंधित कार्यक्रमांच्या अंमलबजावणी दरम्यान सद्यस्थितीत येणाऱ्या अडचणी बाबत चर्चा, कथा कथन सत्र, पथनाट्य, मासिक पाळी व्यवस्थापन, एफटीके (Ftk) किट चाचणी करण्याचे नियोजन सुरू आहे.

ग्रामस्तरावर पाणी, स्वच्छता व आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या स्वच्छता कामगार महिला, स्वच्छतेच्या मालमत्तेचे परिचालन, देखभाल व दुरुस्ती संबंधित सुयोग्य व्यवस्थापन करणाऱ्या महिला नेतृत्व, किशोरवयीन चॅम्पियन, क्षेत्रीय तपासणी संचाच्या सहाय्याने पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण करणाऱ्या महिलांचा तालुकास्तरावर सत्कार सोहळा आयोजित असल्याबाबतची माहिती पाणी व स्वच्छाता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे यांनी दिली.

विशेष सत्कार- पाणी व स्वच्छतेचे व्यवस्थापन करणारे स्वयंसेवी गट, नेते, किशोरवयीन चॅम्पियन, पाणी गुणवत्ता बाबत देखभाल दुरुस्त करणाऱ्या महिला (एफटीके किट वापरून) आणि वॉशच्या कार्यात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या सर्व महिलांचा याप्रसंगी विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

असे होणार उपक्रम- जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता धाव (वॉश रन) आयोजन, महिलांचा सन्मान, ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभेचे आयोजन, जिल्ह्यात किमान एक महिला अनुकूल आदर्श ग्रामपंचायती संबंधित मॉडेलची उभारणी करण्यात येणार आहे. स्थानिक महिला नेतृत्वासोबत गट चर्चा किंवा कथाकथन सत्र, पाणी, स्वच्छता व आरोग्य क्षेत्रातील महिलांच्या भूमिकेविषयी पथनाट्ये, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन तसेच एफटीके किट चाचणी आणि इतर वॉश संबधी नाविन्यपूर्ण प्रशिक्षण सत्र, तथा स्वयं सहाय्य बचत गटाच्या नेतृत्वाखालील पाणी व स्वच्छता क्षेत्रातील नाविन्यपूर्ण प्रदर्शन करणारे मेळावे आयोजित करण्यावर भर देण्यात येणार आहे.

# विद्यापीठांचे उपकेंद्र स्थापन करण्यासाठी समिती नियुक्त – मंत्री चंद्रकांतदादा पाटील

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यातील विविध विद्यापीठांकडून उपकेंद्र स्थापन करण्याविषयी प्रस्ताव येत आहेत. या उपकेंद्र स्थापन करण्याची व्यवहार्यता तपासण्यासाठी समिती स्थापन करण्यात आल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.सदस्य अमोल मिटकरी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी सदस्य विक्रम काळे, भावना गवळी यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला. स्थानिक लोकप्रतिनिधींनी निर्णय घ्यावा असे सांगून मंत्री श्री पाटील म्हणाले की, सर्वच ठिकाणी उपकेंद्र स्थापन करण्यासाठी मागणी होत आहे. त्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी या मध्ये पुढाकार घेवून विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कोणत्या ठिकाणी उपकेंद्र स्थापन करायचे याचा निर्णय घ्यावा. एक जिल्हा एक विद्यापीठ या दृष्टीने वाटचाल सुरू आहे. पूर्वी प्रमाणे आता प्रत्यक्ष जाऊन विद्यापीठातील प्रशासकीय कामकाजाची गरज राहिली नसून बऱ्याच गोष्टी ऑनलाइन झाल्यामुळे उपकेंद्राच्या ठिकाणी आता प्रशासकीय कामासोबतच आणखी काही कार्यक्रम राबविण्याबाबत विचार करण्यात येत असल्याचे मंत्री श्री पाटील यांनी सांगितले.

# अवैधरित्या दारू वाहतुक करणाऱ्या आरोपींवर पालघर पोलसांकडून कारवाई



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी तसेच स्थानिक गुन्हे शाखा पालघर यांना पालघर जिल्हयात चालणारे अवैध धंदे, अवैधरित्या दारुची वाहतुक इत्यादीवर कारवाई करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने जव्हार पोलीस ठाणेचे पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच स्थानिक गुन्हे शाखा, पालघर येथील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलिंग करण्यासाठी रवाना झाले होते.

दिनांक ०५/०३/२०२५ रोजी खंचाळा दुरक्षेत्र हद्दीत दादरा नगरहवेली ते जव्हार या सार्वजनिक रोडवर संयुक्त रित्या पेट्रोलिंग करीत असताना पोलीस उपअधिक्षक सारे, यांना मिळालेल्या गोपनिय माहीती वरुन विशाल धाबा येथे पोलीस पथकासह नाकाबंदी केली असता खंचाळा दुरक्षेत्राच्या दिशेने एक तपकिरी आयशर टेम्पो क्र.जि.जे.१९ एक्स ८६९२ क्रमांकाचा टेम्पो येत असताना त्या टेम्पो मध्ये अवैध गुन्हयाचा माल असल्यावाचत संशय आल्याने नाकाबंदीस असलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी टेम्पो चालक यास टेम्पो थांबवून सदर टेम्पो चालक याचेकडे विचारपुस केली असता तसेच नाव गाव विचारले असता चालक याने त्याचे नाव बनेसिंग बद्रीलाल राठोर, वय ३६ वर्षे, रा.१५८ ग्राम सिंहसा धार रोड, ता.जि. इंदोर, राज्य माध्यप्रदेश असे सांगुन त्याचे सोबत असलेल्या इसमाने त्याचे नाव महेंद्रसिंग राजुसिंग रावत, वय २२ वर्षे, रा. टोपास, रामगड, ता. बिहावर, जि. अजमेर, राज्य राजस्थान असे सांगीतले. तसेच सदरचा टेम्पो रिकामा असुन सेलवास येथुन आलो असून नाशिक येथे जाणार आहे असे हिन्दी भाषेमध्ये सांगीतल्याने सदर टेम्पोची झडती घेतली असता टेम्पोच्या खालच्या भागामध्ये पत्र्याचे दोन कप्पे तयार केले असल्याचे दिसले. ते कप्पे उघडुन पाहीले असता त्या खाली दारुचे व बियरचे भरलेले बॉक्स असा एकूण १९,७०,१२०/- रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला. दोन्ही आरोपी यांना ताब्यात घेतले असून त्यांचेविरुध्द जव्हार पोलीस ठाणे येथे गु.रं. नं. ता ५४/२०२५ मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून गुन्ह्याचा तपास हा पोउपनि /स्वप्नील सावंतदेसाई, नेम. स्थानिक गुन्हे शाखा, पालघर हे करीत आहेत. सदरची कारवाई बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, गणपत पिंगळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली डॉ. भागिरथी पवार, परिविक्षाधिन पोलीस उपअधिक्षक, पोनि/ किशोर मानभाव, प्रभारी अधिकारी, जव्हार पोलीस ठाणे, पोउनि/स्वप्नील सावंतदेसाई, पोअं/२९६ बजरंग अमनवाड, पो.अंम/१३१ संदिप राजगुरे, नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा पालघर, पोहवा /१६२४ विटकर, पोहवा./४६३ गायकवाड, पोना/७०३ गाटे, पोना/७१४ विनोद धाक्या वारंगडे, पोअं/१२२२ धोरसे सर्व नेमणुक जव्हार पोलीस ठाणे यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

# पडघ्यातील गुरचरण जागेतुन मातीची चोरी

## पंचविस दिवस उलटूनही कारवाई नाही




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील पडघा ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या एका गुरचरण जागेतुन मातीची चोरी करण्यात आली आहे.

पडघा ग्रामपंचायतीची काही अटीवर मालकी हक्क असलेल्या मुंबई नाशीक महामार्गालगत असलेल्या सर्वे नंबर ३५ ,३९ मधुन जेसीबी आणी डंपरच्या सहाय्याने सुमारे १ हजार ब्रास माती चोरुन नेल्याची घटना घडली आहे. ग्रामपंचायतीचे सरपंच रविंद्र विशे, ग्रामपंचायत अधीकारी भास्कर घुडे व लिपीक राकेश तेलवणे यांनी जागेवर जाऊन पाहणी केली असता ही धक्कादायक बाब त्याच्यां लक्षात येताच सरकारी गुरचरण जागेतुन गौण खनिज (माती) चोरून नेल्याप्रकरणी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार भिवंडी, मंडळ अधीकारी, पडघा पोलीस ठाणे यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रार दाखल करून विस दिवस उलटूनही तहसीलदार कार्यालयाकडून काहीच कारवाई होत नसल्याने पडघा ग्रामपंचायत कमीटी व प्रशासन हवालदिल झाले आहेत. तसेच कारवाई होत नसल्याने माती चोर माफीया मोकाट फीरत असल्याची चर्चा नागरीकांकडुन होत आहे. तर गुरचरण जागेतुन गौण खनिज (माती) चोरुन नेल्याची तक्रार मिळताच जागेवर जाऊन पंचनामा करून अहवाल वरीष्ठ कार्यालयात पाठवण्यात आल्याचे पडघा साजाचे तलाठी विजय लोहकरे यांनी सांगितले.

# कोकण मराठी साहित्य परिषदेच्या पोपटी कवीसंमेलनास उत्स्फूर्त प्रतिसाद




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कोकण मराठी साहित्य परिषद पनवेल शाखेच्या पुढाकाराने बुधवारी विचुंबे गावाजवळील शेतमळ्यावर पोपटी कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उपस्थित ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांनी या संमेलनांना मिळणारा कवी, साहित्यिक, राजकारणी, उद्योजक मंडळींचा वाढता प्रतिसाद पाहुन रात्रीच्या वेळची अशी पोपटी कविसंमलने भविष्यात अधिक प्रमाणावर घेता येतील असे विचार व्यक्त केले.

पोपटीची कल्पना रुजविल्याबद्दल प्रा. एलबी.पाटील आणि सातत्याने आयोजन करणारे पत्रकार गणेश कोळी यांचे म्हात्रे यांनी अभिनंदन केले. दर्शना माळी यांच्या सूत्रसंचालनाने सजलेल्या या संमेलनात प्रवीण बोपुलकर, गझलकारा ज्योत्स्ना राजपूत, विनोद भांडारकर, गोपाळ शेळके, गुणवंत पाटील, अनिल भोईर, अक्षता गोसावी अशा ३७ कवींनी कविता सादर केल्या. यावेळी विचारमंचावरील मान्यवरांना सन्मानचिन्ह, शाल आणि सर्व कवींना कोमसापचे प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह तसेच विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित राहिलेल्या पाहुण्यांना शाल, सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

यावेळी रायगड जिल्ह्याचे वैशिष्ट्य असणारी पोपटी शिजवून सर्वांनी तिचा सामुहिकरित्या आनंद लुटला. विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, सदस्य अनिल भोईर यांनी व्यवस्थापनाची बाजू सुयोग्यरित्या सांभाळली. विलास पुंडले, गणेश म्हात्रे, रामदास गायधने, स्मिता गांधी, गुरुनाथ म्हात्रे, इत्यादींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# जयंतीच्या दिवशी 'ड्राय डे' घोषित करा

## अन्यथा मंत्रालयातील महाराजांच्या फोटो समोर उपोषणास बसण्याची परवानगी द्या: हरिष बेकावडे




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : महाराष्ट्राचे आराध्य दैवत, मराठा साम्राज्याचे संस्थापक, संपूर्ण देशाचे प्रेरणास्थान श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त 19 फेब्रुवारी रोजी महाराष्ट्रसह देशभरात त्यांच्या शौर्याच्या आणि न्यायप्रिय कारभाराच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी शिवजयंती मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम, शिव व्याख्याने तसेच गडकिल्ले संवर्धन , सजावट व कार्यक्रम आयोजित केले जातात. मात्र या दिवशी दारूची दुकाने, बार, रेस्टॉरंट मध्ये सर्रास मद्य विक्री केली जाते ही महाराष्ट्राला काळीमा फासणारी गोष्ट आहे.

संपूर्ण देशभरात विशेषतः महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक, सामाजिक जीवनाचे आधारस्तंभ असून त्यांच्या जयंतीला अनन्य साधारण महत्त्व आहे. त्याचबरोबर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधानाचे शिल्पकार असून सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी आणि समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाची तत्वे स्थापन करण्यासाठी त्यांनी खूप मोलाचे कार्य केले. त्यामुळे या दोन्ही जयंतीच्या दिवसांना महाराष्ट्रात मोलाचे स्थान आहे. म्हणूनच या दिवसांचे गांभीर्य राखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने या दिवशी "ड्राय डे"घोषित करावा. तसेच तसेच या दिवशी दारूची दुकाने, बार, रेस्टॉरंट सर्रासपणे मोठ्या प्रमाणात दारू विक्री करत असल्याने मिरवणुका व कार्यक्रमामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यक्रम मध्ये महापुरुषांचा अपमान होऊ शकतो तसेच कायदा व सुव्यवस्था बिघडू शकते याचे भान महाराष्ट्र शासनाने ठेवावे.

ज्याप्रमाणे राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती ,स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन व इतर निवडणूक कालावधीमध्ये "ड्राय डे" असतो. त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज जयंती व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाने तात्काळ "ड्राय डे" घोषित करावा. याबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्रिमंडळ, खासदार, आमदार यांना पत्र देऊन सामाजिक कार्यकर्ते हरिष बेकावडे यांनी मागणी केली आहे.

जर याबाबत आपण निर्णय घेत नसाल तर मंत्रालयातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या फोटो समोर शांततेच्या मार्गाने मौन व्रत धारण करून आमरण उपोषण केल्यास महाराष्ट्रातील 288 आमदारांना तसेच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांसह मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांना याबाबत जाणीव होऊन छत्रपती शिवरायांचे नाव घेऊन राजकारण करणाऱ्या राजकीय पक्षांना देखील याबाबत निर्णय घ्यावा लागेल.तरी दोन्ही जयंतीच्या दिवशी ड्राय डे जाहीर करा अन्यथा उपोषणाला बसण्याची परवानगी द्या असेही शेवटी म्हटले आहे




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024